आसरा तुज हा बरा हरिभक्तिचा जरि लाधला ॥
त्यागिसी सहजागती मग दृश्यिच्या भवभ्रांतिला ॥
मायही मनि मानते हरिदास हे मुल आपुलें ॥
पाळितें कनुवाळसें जसि माउली सद् कोंवळें ॥ ११ ॥
कां तरी दिठिं कामिनी मनिं कातरी विषयीं नरा ॥
बावरा करि हांवरा मति मोहुनी गतिचा चुरा ॥
नाहिं ज्या दिठिची भुली मन मोकळी इज पासुनी ॥
तोचि रे परपारिची नित देखणा गति बोधनीं ॥ १२ ॥

साव हा सद्भाव ज्या मनि प्रेम तो बहु आभरे ॥
शांतिचें नित स्नान ज्या अनुभावनीं तनु सांवरे ॥
माव ना नच ढोंगिसा तद ज्ञातिचा जिथ खुटला ॥
पीकला निजिं टीकका नच वीकिला हरि पाहिला ॥ १३ ॥

सांवळा मति गोंवळा नच आकळे इतरा कळे ॥
सूमनें नच तीं मनें मग कोंवळें सकळीं कळे ॥
फूललें मति तोपलें भ्रमरामिषें हरि येतसे ॥
संत हे इह रीतिनें रस प्रेमते निज सौरसें ॥ १४ ॥
हें मना सद्सेवनीं अजि जोड तूं बहु गोड तें ॥
पाहिती निज संत ते प्रिति आवडीं पथ गोड तें ॥
मंद सूत अनंत कंद अमोघबोध भवामधीं ॥
होत जात अनंत त्यांत समागमास जमा निधी ॥ १५ ॥

---

## २ हितसार.

( इंद्रजावृत्त )

सदां सर्वदां ध्यायिंरे राघवातें ॥ नको काळ हा घालवूं वीषयातें ॥
धनाला मनानें सदां आठवावें ॥ हिता नाडणें पाप खाणीं पडावें ॥ १ ॥

नको तूं मना घोर पंथांत जाऊं ॥ नसे सूख तेथें जिवाला अभावू ॥
नको कामना कामिनीची दुज्याचे ॥ असें पाप ना दूसरें दुष्ट नीचें ॥ २ ॥

माऊ तुझे परि तुला दुरि टाकिती ते ॥ नाहीं जरी धन करीं मग कोण नातें ॥
मागें जरी जवळि तें मग सर्व गोतें ॥ नाहीं तरी उलट तें पुनरेव लातें ॥ २ ॥
कांता लवे बहु घरीं जरि संपती ते ॥ बोले बहु रसिकता मनमोहनातें ॥
हांसेरुसे घडि घडीं तुज कायवाचे ॥ पाहे तुझो तुज असीं तुज आस कैचे ॥३॥
पाडे घरें सकळहीं म्हणसीच माझें ॥ माझें म्हणे छुलियांतचि मृत्यु माझें ॥
अंतीं न येति तुजला स्थुळ नास साचें ॥ पाहे० ॥ ४ ॥
कां तूं उगां तलुवरी भित बातचीसी ॥ मायो म्हणोनि रमतां असि फार होसी ॥
नाहींच चीरजिव तों स्थुळ नासण्याचें ॥ पाहे० ॥ ५ ॥
कर्मे करित बससी जरि मुक्तिकाजा ॥ धाजार हा समज तूं भिपगेंच साजा ॥
मणोन्त मुक्ति सकळां तुज नाच याचें ॥ पाहे० ॥ ६ ॥
साक्षी नसे अजवरी दिढि येथ कोणीं ॥ येवोनियां पुनरपी पिसरें हि कोणीं ॥
शास्त्रांतरें बहु तुरी बहुबोध वाचे ॥ पाहे० ॥ ७ ॥
दानें करोनि तनु ही जरि शुद्ध होते ॥ मानूं खरें परि सुदान न होत हातें ॥
कर्तेपणा धरुनियां रुपवे यचाचें ॥ पाहे० ॥ ८ ॥
सर्वांभुतीं नच घडे समरोम दृष्टी ॥ ऊंचीं, फळें तंववरी असमेवसृष्टी ॥
नाहींच शांति सुख तें गुरुविण वाचे ॥ पाहे० ॥ ९ ॥
घोडे गडी चवघडे करणे नगारे ॥ कीर्तीभरें दिसत हें सकळीक वारें ॥
गावें हरी दिननिशीं नलु काम साचें ॥ पाहे० ॥ १० ॥
गोविंदनास वदतां वदतां पुढा रे ॥ वाचे करो अमनता मन तेंचि वीरे ॥
नाहींच आठव स्थुळीं मग वास वाचे ॥ पाहे० ॥ ११ ॥
भूली भ्रमाचि निमग्रास उदात्र हाची ॥ साचो मना समज तूं रघुनाथ साची ॥
नामाविणें नचढुणे कळिमाजिं साचें ॥ पाहे० ॥ १२ ॥
कर्मांतरें प्रसजशीं मति त्याचरूनें ॥ कर्मे करीं अनिमती फळ हेत मार्गे ॥
होणार तें चुकविता नच कोण साचे ॥ पाहे० ॥ १३ ॥
मायाच ही हरिजिची गुणरंग बाणी ॥ बीजोद्र हा करितसे पद चारि खाणी ॥
उद्भीज अंडजजें मिन स्वेद ज्याचें ॥ पाहे० ॥ १४ ॥
आहे मती नरकुडी गडि जोडि ईशा ॥ फुकां नको दवडुं तूं धरुनीच आशा ॥
मोहामधीं घुसमुसी भय त्या यमाचें ॥ पाहे० ॥ १५ ॥

तुज विण गुणधामा नावडे आणि कांहीं ॥
मम हृदय निवासा कारणीं तूंच होई ॥
शिणत भवपुरीं मी जाणसी सर्व हेवा ॥
सदयपण सती तें दातया आजि ठेवा ॥ ३ ॥

नच करि तुज लागीं ती दया दीन भावीं ॥
सकळ हि सरलोसे वाटते आत्मभावीं ॥
निज जन हित काजीं पेरिली पेरणी रे ॥
मज वरि दिठि नाहीं कोण कामें हरी रे ॥ ४ ॥

स्थपिलीं जतन व्हाया कारवी दृष्टि पाहे ॥
दुरुनि च प्रतिपाळी या भवीं साक्षि आहे ॥
तव रिति निज दासा ठायिं या याच भावें ॥
अवगत इतिहासीं गीत केलानुभावें ॥ ५ ॥

नरहरि नरपाळा सांवळ्या सार्वभौमा ॥
सदय हृदय प्रेमा सागरा नीजधामा ॥
जगलग स्वरूपा तूं साक्षि रूपा परेशा ॥
मज वरि करुणा या राहुं दे गोप वेषा ॥ ६ ॥

सदय हृदय व्हावें प्रेम कूसीं भरावा ॥
द्विविध मतिस नासी ऐक्यभावें जळावा ॥
रस भरी रसनेला कीर्ति तूझी वदाया ॥
सुजन सहज वासा ठाव दे रामराया ॥ ७ ॥

हरिजन गुण गाते तेथ नातें असों दे ॥
अभिमति मतिलागीं ऊफंखातें नसूं दे ॥
कलिमळ समुदावो देह भावो नसावा
मन मिल जळपादीं सत्पदीं ठाव व्हावा ॥ ८ ॥

जननिति परिवारा पासुनी रामराया ॥
दुर करि मन मोहा प्रेम दे कीर्ति गाया ॥
निज हितभिति ठेवी सार ठेवा गमावा ॥
हरि अरि मद मोहा कामचित्तीं नसावा ॥ ९ ॥

## ६ करुणापर.

(कामदा.)

नित्य दे हरी नाम आननीं ॥ काम वारुनी गुणयामिनी ॥
मानसीं वसे रामचंद्रजी ॥ दीनबंधु जो सौख्यसिंधुजी ॥ १ ॥
ज्ञान ध्यान मी कांहिं नेणता ॥ सूख वाटतें नाम वाणितां ॥
आपुली हरी, स्वात्मभावना ॥ नीज पावलों वाढवा मना ॥ २ ॥
मागणें नसे सांगणें कशा ॥ भेदची तुरे जाणवी निशा ॥
गातसें गितीं स्वात्मया तुंतें ॥ मीपणाविणें भावना चिते ॥ ३ ॥
पक्ष सोडुनी लक्ष जोडिला ॥ आगमोक्तिचा पांग फेडिला ॥
नीगमागमें भाव वाढला ॥ भेद मोडुनी खेद वारिला ॥ ४ ॥
अच्युतासनीं नित्य वासना ॥ वास लाभली लीनता मना ॥
सर्व कामना पर्व संपलें ॥ स्वात्मयागमें नीज संचलें ॥ ५ ॥
कोण ना दुजा माधवा तुजा ॥ तूंचि सर्वही कांत नीधिजा ॥
भक्त देव तूं बाप लेक तूं ॥ भ्रात मात तूं दार गोत तूं ॥ ६ ॥
नित्य तूं हरी विश्वही तनू ॥ संगमीं अनित्यान्वयी मनू ॥
गुणभावजे पूर मातला ॥ भेद हा जना खेद दे भला ॥ ७ ॥
वेद संगमीं जंगमावधी ॥ भेद मातला स्वेद कंपधी ॥
काळ मानुनी आपणा वधी ॥ देह मी म्हणे काळ हे नदी ॥ ८ ॥

---

## ७ बोधपर.

(भुजंगप्रयात.)

कशाला भिशाला मशाला तुलारे ॥ नगारे मशाला बहूवीध सूरे ॥
निशाहे मदाची सिरीं फार वाजे ॥ अहंतामुळें काळ वाधाचि साजे॥१॥
नये कांहिं संगा भवामाजि दंगा ॥ कसा आवडे खेळ हा नास्तिकांगा ॥
रुचेना कशी शाश्वताची गती रे ॥ अरे तूं भजे जानकीचा पती रे ॥२॥
अगा मानवा ना असा जन्म आणी ॥ सुरादीक ऐसी सदा वाणि वाणी ॥
घडे स्वात्मप्राप्ती हरीकीर्तनानें ॥ तुटे बद्धता नाम गा आननानें ॥ ३ ॥

ठावचि आणिक सार न या परपार रमावर तारिल जा ॥
नष्ट जना मधिं व्हांच दळासम संगम मानसिं बोळित जा ॥ ५ ॥
पाहुनियां मनिं सारविचार नको करुं थार जरा पळवा ॥
बाळक तो सद् सुतचि माधव यादव मानसिं ध्या वरवा ॥
रामचि हें निजधाम जनामधिं काम परांग नरासमरी ॥
सुखचि होईल जाउनि मोह जमा धरि ईश वरा कमरीं ॥ ६ ॥
कांत सिता मनिं आणुनियां वरि सोय धरीं नर तोचि बरा ॥
पूर्ण सुखाचि हि मानुनि गाथिंच जानकिच्या नवरा वरा ॥
ढोंग नकोच करूं मळ मायिक टाक मद् माळ गळा अवळा ॥
टाळचि आधिं परांग समान रमाळ फसाळ म्हणा वजला ॥ ७ ॥
धाडहि टोळचि जाणुनि बोलिलि वाणि क्षमा मजलागीं करा ॥
माफि करा मज बोबडि बोलि हि बोलिलि सोलिव बोध बरा ॥
कामयका अबळा समजा धन त्यावरि मोह वरा वसला ॥
फांशचि हा वरता ममता मम मानसिं वाटत बोल भला ॥ ८ ॥
गोधि पयोधर यौवन पाळय गोप किशोर मला गसला ॥
आजचि काननिं कामिनि लागुनि भासत त्रासचि हा रसला ॥
जाणुनियां मग मार्गचि काढित काननिं जाउनि शोधियला ॥
ध्यासचि मानसिं बाळपणामधिं बोधित शोधनिं शोधियला ॥ ९ ॥
काळचि हा सुखकारक जाणुनि मारक मोह मनास निका ॥
खोडहि याचि न गोड निजासनिं फांशचि काल समान सुखा ॥
सार नसो निज जाळ भवामधिं ताक न कांहीं मनास पुसा ॥
व्यर्थ कळा मज भासत दुर्मति त्रासचि मालिक लाभि कसा ॥ १० ॥
वादचि मोकळि रोख मनामधिं शोक कशास्तव आणितसां ॥
साधुसमागमें बोध धरा मनिं गाच रमावरया नवसा ॥
फांस मनांतिल आश न बाळगि सावध होईंच चाळ कसा ॥
कोवळि काळि ति बावळियापरि सावळि वाणिच श्यामकसा ॥ ११
पाळियला मनिं हाचि अनामिक मार्गचि जो धरि नाशकसा ॥
काय मला मग भोग कशास्तव भोगाचे भोगिल आयबसा ॥

या वहिणी घर दारहि याज़र प्रीत करी बहु मोहन हा ॥
वाटतसे मति गायिन त्या प्रति देईल तो गति मेघ पहा ॥ ३३ ॥
बोधनिं रोधित शोधनिं मानस आस नसे दुजि ज्यासचि रे ॥
सावध साधक साधु भला भज वाढत सूखचि दायक रे ॥
सर्व भुती समभाव तयासचि देयहि तेथचि नित्य वसे ॥
पाय धरूं खल मारक तो मदि देईलहो गति भासतसे ॥ ३४ ॥
राम सखा शिवराम पिता प्रिय राम गुरू भज लागिंच हो ॥
तारकमांत्रिक मारक रीपुर वारक शोकचि सारिल हो ॥
दाशरथे सुत गायिन आवडिं ने सज पैल थडी वरता ॥
दुःखमनांतिल दूर करावें हें मोह दुजा मदती ममता ॥ ३५ ॥
फार गुरू जगिं ढोंगिच ते नर बोलति बोलहि आत्मचि रे ॥
चालति उलट गूणत्रयाचरि भासति मायिक हेंचि खरें ॥
पाठक नाटकि याळक वीषयिं माळ गळ्यामधि आळचि रे ॥
पाळिरला मनिं कास रिपू तरि सार्थकि कायनसेच उरे ॥ ३६ ॥
देतिल मंत्रचि घेतिल तेजन जातिल कोठवरा हें नकळे ॥
कारण येथिल जागत नाहिंच मायिक सार्यंत हाचि गळे ॥
मी गुरु हें पद मारक जाणिल त्यासचि सत्यपर्गी, जिरलें ॥
वीरळ हें जगिं देखणियामधिं लोक रितींत न हो विरलें ॥ ३७ ॥
आधिं मना तुज काजचि नाहिं हि सत्यपगीं मन वाटतसे ॥
नाचनि तूं किति संमृतिचेमधिं, सांग मला अजि काय पिसें ॥
कोण तुला धणि या जगतामधिं, सत्यपगीं मज भासत हें ॥
रामचि तारिल हा तुज लौकरि जाणुनि मी तरि सांगत हें ॥ ३८
सत्य मना रघुनायक भेटति मार्गसि त्यासचि यामधिं हो ॥
पार करा भवसागर नामक मोहचि हा तवं आमरु हो ॥
या विरहीत दुजा उपदेश नको परि बोधचि साह्य असो
भाव धरा मति भक्ति करा पुरि जन्मचि हा तुज बाध नसो ॥ ३९
हांसत हात सुखावरि ठेउनि जा परता सर सोडि नको ॥
काय तुला मति मोहिच लागलि पाट तुं सोड जि मारित ठुको ॥

पाळक जो जगपाळक मानासिं माळ गळां कशि दीसतसे ॥
शीर्षहि शिखिपिच्छ डोळे गुंजेवरि सत्यचि हा हरि पोर पिसें ॥ ४७ ॥
सुंदरमूर्ति शोभत आधरि सुस्वरता धरि नीजरवा ॥
रक्षित राधिच गोकुळ पाळक नीज तें बाळक सौख्य भवा ॥
हाटक हा पट पीतक सोंदिठिं देउनियां मिठि घालि मना ॥
पार तरा भव सारचि जाणुनि वाणि गितीं धरि आजि गुणा ॥ ४८ ॥
घामट ती मति राखुं नको मनिं धामनिं कामिनि पाहुं नको ॥
गात तुंया हरि भाव बरा धरि रोष नको उरिं काळ झुको ॥
माळहि वाळि तुं एकपणा धरि बोलि हिगा वरिनिजहिता ॥
सावध सावध आवधि नाहिंच वेळ हे गोडच जाग गिता ॥ ४९ ॥
कक्षुमिचा वर पक्षचि या धरि दिक्षित हा हरि आत्मसुखा ॥
पारचि तो जनि भाव बळें मनिं राखियला गुणिं रामसुखा ॥
वेळ असे तुरि हा कलि मातुरि वाटत खातुरि गुंतु नको ॥
नाच कसा इट व्यर्थचि हा मठ मायिक कीगाट प्रेम निको ॥ ५० ॥
द्रिष्टि स्त्रियांचि हि ऐहिक जो मनिं कष्टचि पडुनि व्यर्थ मरे ॥
साधुसमागम आगमें पक्षिच लक्षित राहेच चित्त थिरे ॥
वित्तचि हें दिठिभूलचि गा वटिंवाटचि तो पटिं माधिक रे ॥
चोरपणा मनिं घोरनसे निट सत्यचि वा घट राखिंच रे ॥ ५१ ॥
पाजळि वाति हि ज्ञानअनूभव नाशिल हा भव संत मना ॥
रामचि घोळवि काम नको मनिं ठामचि हें करि शांति घना ॥
धीटचि तो निट भाव धंकोंविरि सावचि आवरि या गतिला ॥
सूचिल जी मनिं पूजित ती करि सतकुळासह योग्य तिला ॥ ५२ ॥
मोर जसा निरमोह तयावरि मेघचि वा धरि चिंतित त्या ॥
काय मि वाणुं हें काणु मती हिच जाणुनि ध्यातसे सत्यचि त्या ॥
रामचि हा घन मानस मोरचि जोर करी रुचि ध्यान धरा ॥
नाहिंच मागुति पंचभुतीं निति मानवि कायहि त्याच तरा ॥ ५३ ॥
पोटभरी परि मोट नको करू रामचि वा धरं सत्य मना ॥
राखु नको चित्त त्या परकामिनि अंतर शोधनि बोध मना ॥
भोगचि हा तुव गोड बहु दिसे तोड करी हिच आत्मधना ॥ ५४ ॥

ही तरणी सार्जे भाविंत मानसि भक्ति जरा कुशि वेष्टितही ॥
जो मानि घष्टिळ सोशिळ कष्टचि होईल श्रेष्ठचि स्पष्टचि हो ॥
बोधानि रांधित रोजचि जो मनिं कामिनिधामिनि चित्त नसे ॥
त्याचचि थारिच सांपडे रामचि भावबळासचि साह्य असें ॥ ५५ ॥
गोरिच पोरिति जोरिहि फारचि माळति घालित नीज तुला ॥
थोरि नसे इसि बाक्कळ ती मति पुष्कळ बोलत बोध निका ॥
गांठहि आजचि भावबळें मन मानसि येउनि खास वसे ॥
प्रेमळ ही किती वाणुं तिची गति ताळचि माळ ति घालितसे ॥ ५६ ॥
वाजति पैंजण काईर हा झग मोहचि रोजग नाशक हे ॥
शब्दचि येथिल जो निज माखित होईल आतिल त्यासचि हें ॥
सोडचि जोडवि बोलति जे कवि सुभ्रम हारवि शब्द निका ॥
मानिन माझिच खासपणें मति शब्दचि तोनिति ठेंठमका ॥ ५७ ॥
काय नथी निकि नासाके शोभत मोतें लि लोंबत ओंठ तुला ॥
हीळमिळीं लिन मुक्तचि हे गुण पंचकडी सुण तत्त्वमुला ॥
भाधर हा वर नीज ति जीभकि आत्मसुखा भाळि डाळविते ॥
भक्ष जिचे पतियज्ञगती मनिं लक्षचि लावुनि पाळविते ॥ ५८
वे रस हा मनिं बोधचि लावुनि कामिनिचा मनिं दोष नसे ॥
ऐक्यचि होईल लाजचि सोडिल सोडिल ओढिल भोगरसें ॥
भालिच भाळींहि बाळि सुढाळेंच बोलति सूळेंच नित्य असे ॥
सद्गुरुनाथचि दायक हा एक नाथचि ह्यानंत मागितसे ॥ ५९
पार्वतिचा पति थाबि मळा मासे उत्तम ती गति होंवि नको ॥
पावन करक नाम तुझें हर मूरचि हा हर मोह झुको ॥
त्रास नको मज त्रासचि हा भिति पूर्णचि दे दिठि बोधावरी ॥
हे हर हे हर संसृतिला हर दीन भिशा नर भ्रांति तुरी ॥ ६०
कोणि एके दिनिं कामिनि रत्ना मनिं बोलति भामिनि नंदुजिचे ॥
पोर तुझा निट चालत नाहिंच तूहिहि साठेच काम निचे ॥
गाळि ग देतचि नष्ट तुझा हरि गोष्टि हि ना बरि वादतसे ॥
वादविलें कुळ मूळ तुझा सुळ राखिशरी बळ जन्न असे ॥ ६१ ॥

नेति मला गृहिं आग्रहकारिणि सत्यचि जारिणि पान तुं आई ॥
लज्जित ऊघडि पाहुनियां दिठिं झांकुनि गे मिठि साजणि गाई ॥
भीतचि मीपण नाहिंच गे मज त्रीगुण तें बिज सोडुनि आसे ॥
भक्तिलिलेमधिं गर्कचि होउनि प्रेमळ गे मनिं तेथचि वैसे ॥ ६९ ॥

ऐकुनियां मग गोपनितंबिनि हांसति त्या मनिं प्रेमचि हो ॥
चाळविल्याविण चालत नाहिंच नीजचि बाळक बोधनिं हो ॥
साधिमना तुंचि भावबळें हरि गोजिरि सांवळि मुर्ति मिको ॥
कृष्ण रमावर शोभनपाळय अनंत गीतचि आत्मसुखी ॥ ७० ॥

कुंजवनामधिं पूज्यचि हा जणुं वाटत साजणि कामिनिचा ॥
वेष्टित त्या हरि गोपकिशोरि ग पोरि मनीं समबुद्धि निका ॥
काय ति वाणुं मि वाणि मुखा धणि कारण कार्यहि सोडुनियां ॥
पायिंच लागुनि पार करूं भव उत्तम हा नत्र ये उदया ॥ ७१ ॥

मोहित नेत्र ति पात्र निजासनिं भावबळें सखि तींचहि राधा ॥
ऊभि पराभुवनांतरिं शोभत गौरचि तो रंग भक्तिच सूधा ॥
कृष्णगडी हुस शोधनि मीळत राहेच लोळत कात जसा तो ॥
प्रेमळ सज्जन गाउनि ध्या मनिं सोडुनि शोकहि थोकित जा तो ॥७२॥

गोपकिशोर हि थोबडि वाणिच गाणि नसें नित बोलुं किती ॥
सख्य तिघांसिच प्रेम तयांवरि शाम भक्ति सम भाव निती ॥
बोबडि बोलि ति जीभ हि मोठवि साठवि ती मनिं प्रेम सखा ॥
कौस्तुभधारण तो तमशामन गाउ मनीं असुहीत सुखा ॥ ७३ ॥

नीरहि उत्तम ती यम नीयम उत्तम ही मति नीररुपें ॥
आगम नीगम त्या थडि हो तिज बोधकदंबरसौख्य कृपे ॥
शोकरहीत ते लोक हि चिठती पिका शुक बोधन ऐक्यनिती ॥
भागवता अति ठाणचि देऊनि विवेकि धाणति शुद्धमती ॥ ७४ ॥

कामदा वृत्त

राधिके मनीं काम तो बहू ॥ धाम सोडुनि प्रेम हो नहू ॥
वीध ती रिती भक्ति भाविका ॥ प्रेमळा मनीं सौख्य दायका ॥ ७५ ॥

संसृती नाशक पोर कसा तरि घोरचि तो उरि कावितसे ॥
पोरपिसें नवि चोर निजासनिं बोळ ते नीगमिं बोध मिषें ॥
सासुरवासिनि धांसुचि हो मनिं हातचि थावरि जोर फिका ॥
दादुले मस्तकिं वासर हारव नीजचि ते रव आत्मसुखा ॥ ६२ ॥
आणिक दूसरि आळि जि हो मनिं नाम तिला जनिं कासि असे ॥
पूनित दोंद ति सून निजासनिं जागति ते बुध वाणुं कसे ॥
बोळ तिचे जन शानिंच धारण कारण यांतचि फार असे ॥
सार नसे नवनीत ति हा रस सारचि बोधि ति भक्ति असे ॥ ६३
मागत हा मज आजचि सार्वगि मारिणि रांजणिं काय असे ॥
घाय बसे उरिं सायिचकाढुन आमेंदं भूवन घांसतसे ॥
नासित आंगण ॐइति ते गुण भिरिकनता घण नासितसे ॥
बुद्धि ति काढुन विवेक हातचि नाचत गातचि वाणुं कसे ॥ ६४ ॥
फूळि ग काढित मूलत त्यांगिच तोंडहि पुसत आनंद कंदा ॥
वारिज नेत्रचि वारितसे सति सांगु तरीं किति तोचि ग धंदा ॥
धूळ करांमधिं घेउनि झोंकित मारिच रोखित वाटग आई ॥
गोविंद सुंदर श्याम मनोहर मारक मोडचि हाचि अंताई ॥ ६५ ॥
प्रीतिच थावरि फार तुझी गे मारचि कळे कां मज लागीं ॥
ढोंगचि मूळचें सोंग जनामधिं भावदि अंबुधि व्हा समभागीं ॥
जाउनि तो वस आम्हिहि जातच भाळुनि खासचि प्रेमळ होतो ॥
होइल तो गुरु शीवांचि साक्षपि भाळचि सोमचिपूर्णचि होतो ॥६६॥
ऐकुनियां मग पुसत ती हरि मायचि जी वरि श्रीहरिला ॥
कां रे तुं कामिनि चाळविली ठगिं काय नसे सुगि मां वरला ॥
खोडिच गोडिहि जोडिवि मोडि तुं सोडुनियां मज देई सुखा ॥
ऐकुं किती सति कारचि सो दिनिं सार नसे तुज बाह्य सुखा ॥ ६७ ॥
नाहिंच मा मज सोडिचि हैल ति कांगिच हांसति सांगुनियां ॥
नष्ट गे गौळणि चाळविती मज नाहिंच तें तुज बाळटिया ॥
काय वदूं तुज मा सि गे दाळक चिरपद चाळक शोधलिचा ॥
गोपि कळा हम माळिनिया श्रुति भासति गे मति बोधनिचा ॥ ६८ ॥

जानकिचा धव आठवि मानसिं भ्रांतिस तो सत्य नासिक रे ॥
कारण मोहचि जाईल सोडुनि तारिल तूजसि हा धणि रे ॥ २१ ॥
या जगतीमधिं तारक रामचि साक्षि असे मुनि वाल्मिक रे ॥
उलट नामचि घेउन तो सम राघव प्रेमळ गाईच रे ॥
चोरचि ही मति वीषयिं गुंतुनि मोह धरी शिरिं खासचि रे ॥
क्रोधपुढें मग आगचि लाविन नाचत द्वैतहि तालिंच रे ॥ २२ ॥
याविण दूसरि गोष्टचि खोटि ति सत्यचि हा धणि राघव रे ॥
हा शिव हा शिव ध्यात सदा मनिं धा मनिं सांगत पार्वति रे ॥
तारक हा धुक दायक धामचि मारक कामचि सत्य खरें ॥
सावध सावध साधुजनाप्रति विकल्प सांडुनि पूसचि रे ॥ २३ ॥
दाशरथे तव पादसरोजनि नाशक मोहचि सत्यपणीं ॥
वाटत मानसिं खासचि सांगेन दासहि होईन तूंचि धणी ॥
मान नको मज ध्यान तुझे धरुं काम मुखासचि लावुं गुणी ॥
हे रघुवंशज हे मुनिपालय गा लयकारक रामपणीं ॥ २४ ॥
बूधनही रविवंश पुरोहित संसृतिनाशक अरुंधतिचा ॥
जो पति शांतचि नाम वसिष्टजि स्पष्टचि भानुच भास मतीचा ॥
शुभ्र जटेवरि माळचि शोभत रुद्रचि ती धृति अक्षपणाची ॥
पक्ष बरा मज वाटत साचचि नीगम ही गति दक्ष गुणाची ॥ २५ ॥
दुःखचि तें सुख भाउनि मानसिं अंतर शोधनिं चित्त वळे ॥
काय डणें मग त्यासि नसे जगिं पूर्ण सनातन सूख फळें ॥
विलक्षण हीं तनु दृश्यचि लक्षणिं मायिक त्रैगुणि नांदतसे ॥
सावध सावध हा भव बा वध वेळ दिसे बुरि सांगतसे ॥ २६ ॥
सज्जन संगति इच्छित जी मति सूख तयाप्रति रामचि दे ॥
भक्तचि तो इश ईशहि भक्तचि साचपणीं हिच गिरा वदे ॥
शीवचि तो रघु रामचि गा शिव ऐक्यपणीं मनिं साधुच ये ॥
या भवपारिंच मानव कूडिहि वीकल सोडुनि साधु वये ॥ २७ ॥
हांजि जि एकचि एकपणें मति भूतदया धृति जेथ वसे ॥
श्रीमल सज्जन प्रेमळ भाविक पूर्णपणें जणुं नाथ असे ॥

तो नर दुर्लभ दुर्लभ या जगिं काज नसे दुजि गोष्टि हितीं ॥
जो गुण सोडुनि द्वैतहि ती मति टाकुनियां मन आत्महितीं ॥ ४६ ॥
पाव दयानिधि श्याम मनोहर तारि मला हरि घे पदरीं ॥
व्यर्थ मि पामर या जगतीमधिं वाटत आजचि दुःख पुरी ॥
काम मदें मन घाणचि ती करि शांति नसे उरिं वेळ बुरी ॥
घोरच लावित ही ममता मज क्रोधहि ऊठवि हेचि सुरी ॥ ४७ ॥
भाविक हें मन गूणसर्गे भवि भ्रांतिरुपीं दिनिं खेळतसे ॥
जाग्रति नीमलि मागुन आपण स्वस्थपणें निज घेत असे ॥
आयुष्य यांतचि गेलिच या मग अंतरलें सुख दुःख दुणें ॥
काय प्रभू तुज काकुळती नसे दीन मि पामर कर्म उणें ॥ ४८ ॥
या जगरींतित वागणुकी बुरि काळ गती कलिं नामचि रे ॥
बा मन स्थीरचि नाहिं कदां उरिं शांति जरा तरि यासिच रे ॥
निंदक दुष्टहि फार जगामधिं भाविक वीरळ दृष्टि पडे ॥
त्यासहि दुःखचि देतिल हे जन आपमतें शुचि दुष्ट भिडे ॥ ४९ ॥
झुटि हि संगति कामिक मानवि सोडुनि दे अजि चाल कसा ॥
मोहचि घालुनि बांधति तूजसि फीर मना चल सावधसा ॥
सूखचि तें दुःख पुढतिं होइल फांसचि हा तुज सत्य असे ॥
काळचि घालिव भार नको धरु आणिक ना धणि राम असे ॥ ५० ॥
तो गुरु हे मन साधुन घेई ग आपुलिया सुख धामाला ॥
द्वैतविवर्जित मोह समागम नाहिंच तो जणुं गूणाला ॥
हा एक सज्जन जाणुनियां मन सावध होउनि आठिव रे ॥
जातचि जी तुज बाटिव जा चल जो अज नामिक गांठिव रे ॥ ५१ ॥
सोडि मना तुंचि भेद नको भुलिं घोरचि हा मनिं हें समजा ॥
वीषम काळचि द्वैतबुद्धि ही जाणुनियां हरि आजिं भजा ॥
भूतदयेसम दूसरें साधन नाहिंच या जगिं सत्यपणीं ॥
कोण नसे धणि मानवलोकिं जि तुज थरीं करि ईश धणी ॥ ५२ ॥
मारलिया मनिं काम अरी मग या भवपारिंच घाण हि रे ॥
मोहमदें फुग राम्त हा अरे स्मृति ना बरि सोडचि रे ॥

फांदा दांक तटा भटा हट मठा हूठाव कूटा तुटा ॥
फूटा पूर्व घटा नटाकृति कटा खोटा वराना सुटा ॥
भेदा भेद सभे उभे नभ सुभे जीभे दुभे आवडी ॥
भेटाया हरि ये हरान्वय प्रभे वेदां भुजीं सांवडी ॥ २१ ॥

( मालिनी )

कुच चटक कळेची काजळी अंतरी ना ॥
सुखकर रस वाणी वर्णि भावार्थनाना ॥
मन अमन जयानें होउनि शीघ्र ठाके ॥
समपण दिठि पावे ज्ञेयज्ञसी सुफांके ॥ २२ ॥

( शार्दूल )

कर्मांकर्मगती कदां निरखिना ना कामकर्मी लिपे ॥
कामें काम झुकावुनी मति सुखा काराप्रती जी लिपे ॥
विज्ञाना भरणें वितोप भूमिके वीलास आत्मान्वयें ॥
विज्ञसी मम विद्यमान मतिची सद्भाव या बोलु ये ॥ २३ ॥

बाकीचे बरवें बळें बहु गुणीं बाजेकरीं भ्रांतिचे ॥
बाजारी भणगे बकाकृति कथे गाबाळ संसारिचे ॥
नाना ढोंग मते न ते विनयते दाते घरें धुंडिती ॥
मुंडी ते तनु आश्रमीं सकळही मुद्रा न त्यांचे मती ॥ २४ ॥

शास्त्राचे कसले सभाधिटपणा वेदार्थ पांघूरले ॥
मायेने मद मावळे मन कळे तुल्यांश ते वाढले ॥
ढीले धीट कसे अधीट धिवसे धीरा धरूं हे गणू ॥
वाणूं काक कसा समान भवि या त्या राजहंसूं म्हणूं ॥ २५ ॥

( शिखरिणी )

विधीचें चालेना मत मति जया तेथ नर हे ॥
विधीच्या छंदानें विलसति कसें भ्रांति भव हे ॥
न वाचे वर्णू ये परपुरुष हा ग्रास चिकळे ॥
परेहूनी जो कां पर विरम तो वीर सुबळें ॥ २६ ॥

( वसतति० )

कोणी करी नवस तो तुळजा तुकाई । राखे सुखी हरिस या करुनी उपायीं ॥
देवी तुजा करिन गे सम गोंधळाला। मेंढा मदोद्भव दिला खचितेव तूका ॥२४॥

( द्रुतविल० )

जल चढे गुढग्यावरि गोपिसी । घननिळाप्रति ये वरि नाभिसी ॥
उचलुनी हरिला कडियेवरी । सति धरी प्रितिनें मति बावरी ॥ २५ ॥

तंव हरी सलिला नित सागतो । तरणुपाय रुपा रव भाव तो ॥
समग्र हा उभयां जन अर्थकी । मन धरी तरि ये भर लौकिकीं ॥२६॥

( शार्दूल० )

फेडोनी चिरचोळिया जलप्रवारोधाकरापासुनी ।
छिद्रें बंद करा विरोध मतिनें राखा मला येथुनी ॥
आतां नाव तळाप्रती बसतही काळांत गे गांठला ।
मोहाचा खटला भला गुणिक हा लाभार्थता साचला ॥ २७ ॥

माते माय कशी दिसे यशुमती येथोनियां पूढतीं ।
नीरीं ही बुडवी भवीं तुमचि गे साक्षी गमे नीगुती ॥
गोपींनि लुगडीं त्यजूनि तनुचीं छिद्रें तदां रोधिलीं ।
इंद्रीयें विषयाकडोनि परती ज्ञानेंप्रती बोधिलीं ॥ २८ ॥

( मालिनी० )

कितिक कर करोनी अंजुळी पाणि काढी ।
कितिक ह्रदयि गेल्या भंगुनी भ्रांति ओढी ॥
समय कठिण आला चित्तवृत्ती उडाली ।
अभिमति तनु भावो भावना ती बुडाली ॥ २९ ॥

( दिंडी. )

नीर आलें नाभिला झांकुनिया । गोपि छातीला लहरि भार माया ॥
गुह्य काया झांकली अंबुमाजीं। तदां कृष्णा घेतला शिरामाजीं ॥ ३० ॥

कंठ बूडे जेधवा गोपिकांचा । अंत वाटे पोंचला सकळिकांचा ।
तदां मूखा पाहती हरीजीच्या । धांव म्हणती माधवा गौळियांच्या॥ ॥३१॥

शशिवदनाकुल राधिक श्रेष्टिणि मध्यगणीं उभि मंडळिं त्या ॥
हरहर संगति निष्ठुर निर्मुह आजि कळे मनिंया हरिची ॥
वळवळ लावुनि या पुरवासिनि आवडि रूचलि बटकुरिची ॥ ३ ॥
मळकट वाखळ मर्कटसी तनु गर्क मती कसि ती वरतो ॥
बहु रमला तिशिं नाविट मानसिं रांड हि दुष्टिण आपमती ॥
दिननिशि अंतरिं विरह जाळित झुरणि लागलि पक्षगती ॥
कपटिच चंचल तर्क न आश्रित घट्ट मती मन पंथनिती ॥ ४ ॥
कसितरिं वांकडि अष्ट ठिकाणिं ति बीबसि भासत प्रेमखुळ ॥
दृढ मिठि घट्ट ति नक्रसमागम मोहक अंजन चक्षुकळा ॥
किडकिडिता कृति चापसि वांकलि जाग्रति हांकलि गोकुळिला ॥
ठकडिच मानसिं मोहियला हरि या व्रज संगतिं मोकळिला ॥ ५ ॥
चडफड स्वप्निंहि जाग्रतिं वीरह नांव सुखसि ति साध्यमना ॥
चिणि फणि आठव आठविना मति जोगसमाकृति वासधना ॥
सण दसऱ्यामधिं नाच समागम दुःखित हा सण भाविमती ॥
नच रुचि भोजनिं आसनिं आश्रित हा विरहानळ जाळि गती ॥ ६ ॥
तट यमुनेवर हा ठक आठवुं नेत्रजलोद्भव न्हावयुं तो ॥
धडधड छातिंत घाव करांवुनिं निष्ठुर मानस हाणवितो ॥
कसितरिं गाइ ठकाहुनि ही ठक कापटि भेपज आकळिला ॥
तनमन–अर्पण चित्तसमर्पण दृष्टपदाक्रांत आभरला ॥ ७ ॥
वन–वन हुंबर पुच्छ उभारुनि धेनु हरिस्तव ओरडती ।
तृण जल भक्षण निशेन सुष्टित ध्यास करेहत त्या करिती ॥
निभिडगिडाकृति पक्षिकुलोद्भव आश्रम शोभत स्थावरता ॥
किलबिल गौरव कृष्ण हरी रव सदपद संभव आ महिता ॥ ८ ॥
सुखकर हा हरि आश्रित यास्तव संगगती भ्रम मानस है ॥
सकळहि निर्फळ स्वरूप हि ना फळ दुःख दुणावत संत न हे ॥
गडबड पुष्कळ चंचळ सूनिळ संग सोन्मद भूतदिनीं ॥
नच सदवे वरवें भरतें मनहें किति रे कथुं मी वदनीं ॥ ९ ॥
घरघुसि रांडसमान न मान तमाम जमाव कमान कळी ॥
उघड बटीक नटीक कठोण कठींत नटीच घटोत वळी ॥

लाजतें मति सांगण्या नच ही थण्या खुण ठाउकी ॥
लावुनी मज बोलिला अजि मान गे करि लाज कीं ॥ २६ ॥

( वसततिलका. )

लाडेंच लाड जडवी प्रित भावना ते ॥ माते म्हणे पति कुठें घरि नाच कांते ॥
तूवां कसी रमसि गे कडि घालुनीयां ॥ शून्यामधीं मुरकुटी दडि देउनीयां २७

( शार्दूलविक्रीडित. )

गोरी तूं तरुणी धणी नसुनियां कांगे फुका वागसी ॥
भीतीनें उगिं शीणसी मतिमधें ऐसी कसी गे खुसी ॥
कांताच्या पदिं मानसी मज धरा आहे बरा नोवरा ॥
सारा गोंधळ आवरा असि घडीं कां नासुनीया मरा ॥ २८ ॥
बाजारीं मरतां कशास सतिनो लोणी दूधी द्या मला ॥
चोरीचें मग कामना करिन मी भावार्थ हा बोलिला ॥
ऐसें बोलुनि झोंबला पदतला झोला दिला गांठिला ॥
फेडीला पट हांसडी उघडि गे तेव्हां मदो तापला ॥ २९ ॥

( शिखरिणी )

अगे मामी नष्टा मुळ तव असा आननिं वदे ॥
अनूरागा आलें मतिमधिं सभे भाव विट दे ॥
बरी काठी हातो धरुनि उठलें तेथ पळला ॥
फिरोनीयां आला भिति नच मुला शोध धरिला ॥ ३० ॥

( भद्रिका. )

सडकेवरची धुळ गे मुठीं ॥ धरुनी शिरला घरिं हा हटी ॥
नयनावरि मारुनि मामि गे ॥ पडलें ताळे मीं तधिं मामि गे ॥ ३१ ॥
असला कसला गुण हा मुला ॥ सकळी नवनीत हरी मुलां ॥
भय ना वसुसा हरि मातला ॥ भव लौकिक गे कुळिं आटला ॥ ३२ ॥

( वसंततिलका. )

बोले असी तव तिनी सरसावुनीयां ॥ सांगे कळी घननिळीं दिठि लावुनीयां ॥
कारे अजीं दडासि तूं अगुणी अनंता ॥ नंदात्मजा तव कळा वदते वदंता ॥ ३३ ॥

मनाचा विचारी जनाचा दयाळू ॥ भवा नाशकू बोधभावार्थ पाळू ॥
कृपाळू सदां दीन भावा कुलीका ॥ मना सज्जनानंत योगार्थ लीला ॥ १४ ॥

अभीमान अंगी जयाचे असेना ॥ नसोनी असे तो जगीं कुमजेना ॥
कदां ना गमे देखणा नीज ठावो ॥ तदा आठवीता हरे देह भावो ॥१५॥

म्हणोनी स्मरावें सदा सज्जनासी ॥ कळी दुर्भरा नाममार्गेचि नासी ॥
मिळे आगळा दीन भावो स्वअंगा ॥ रमाकांत तेंव्हां वळे नीजरंगा ॥१६॥

( शिखरिणी. )

हरी नामें गातां हरसि सकळी प्राकृत गती ॥
जगतीं लाधे जे कां सकळ वळखी नीज निगुती ॥
हरी दीसे अंगीं जनिं वनिं बरा गूण अगुणी ॥
दुजा कोणी नाहीं प्रगवकरणी आत्मतरणी ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा )

भासेल सारा हरिचा पसारा ॥ हारेल सिंधू भवभ्रांति धारा ॥
संताप शांती सुखनाब्द मानी ॥ वेदांत सिद्धांत जयास मानी ॥ १८ ॥

( भुजंग. )

जयाचे वसे काळ धाडी न घाली ॥ मना धांव वेगीं उडी तेथ घाली ॥
नसे आवधी सावधानी करावी ॥ घडीनें घडी सांड जीर्शी करावी ॥ १९ ॥

( शार्दूल० )

मानावीं सकळीं बळी भव वळीं काळा घरीं जाचणी ॥
अंतीं मोह फणी बहु फणफणी तोडावयाची फणी ॥
कामाची नरळी गळी रगडितो क्रोधास जीजी मनीं ॥
मानी ना अभिमान मानसगमी ग्रामीं वसे उन्मनी ॥ २० ॥

वाणी वाणिक काय भाव नगरीं माजील चारी पणी ॥
खाणी संगम नीजबोध अवनी विज्ञान चिंतामणी ॥
स्वात्मा जो अवनी समान वदनीं नित्यानया दाविती ॥
गोंवीती गुणसाधनी करुनियां कठी धरी भाव तो ॥ २१ ॥

( त्रिष्टुप्. )

अनेक योगें पनोध दीक्षा ॥ विनोद जाणे महतींत शिक्षा ॥
सकाम साधूनच शांतिभावा ॥ भली वरा ये सकळी अभावा ॥ १४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कीर्ति सांगुनि आपुली बहुरुपी बांधे शिरें पाउलीं ॥
तैसें संसृतिभाव व्यापकमती नानारितीं चालली ॥
असमांगीं बहु मावळें शिरिं जदा ताहा मनाचा हृदीं ॥
पोटीं कामनला कळा खवळली ना साधू धूर्जटी ॥ १५ ॥

( भुजंगप्रयात. )

मठाचे हटानें करी काम भंगीं ॥ करी बागबागायती त्या प्रसंगीं ॥
बहू भोंदिलीं भोळटें स्तवरंगीं ॥ असी शिष्यशाखा बहू माजलेली ॥ १६ ॥
अगा तो नव्हे मार्ग लक्षी सुलक्षी ॥ असे दंभवादी निजीं हीन लक्षीं ॥
बहू बोलका ज्ञान अध्यात्म गोष्टी ॥ परी पांगळा लौकिकी अर्थ नष्टी ॥
नसे याजला नाम मात्रा प्रभावो ॥ असे फार हाची मना हा न शीवो १७
सदाचार मार्गें सदा चाल बापा ॥ नको आणिकार्थे गाऊं प्रतापा ॥
वसे दीन भावीं उदासी कृतीनें ॥ धरी नाम पोटीं महा योग्यतेनें ॥
कळों नेदिता दुजियालागिं अर्गी ॥ वरा होऊनी चाग पूढें अभंगा ॥ १८ ॥

( द्रुतविलंबित. )

मनसुभा परमार्थ गती निकी ॥ वरिला वेष कशास्तव कौतुकी ॥
निढळ तें अढळे नच साधनीं ॥ विपरिताकृतिच्या नितिबोधनी ॥ १९ ॥

( स्वागता. )

स्थूळभाव जिणला नच साधू ॥ पावला मनपुरीं निज सिंधू ॥
तेथिंचा उगमतो निगमानें ॥ योजिला सहजोद्भव भावनें ॥ २० ॥

( शार्दूलविक्रीडित. )

साधीला निजयोग पंथ मग तो सूसंत झाला भला ॥
चंद्रोनी सदपाउला त्रिरश्तीपासोनि वीसावला ॥
त्याची जी महिमा कथीन सगुणी स्वानंदवाणी वसें ॥
आदी अंत न पार पार भुवनीं तो माधवो सौरसें ॥ २१ ॥

ज्या रितीं मति भासतें तुज हे तुते समजाविलें ॥
मानिलें मग आपुलें विषया बळें धन सत ते ॥
सार्थकीं नच कोण कीं धन जोड कीं वगि आपणा ॥ दे० ९ ॥
बंधु ते नच साहिते धनलोभि ते दिनकाळिं ना ॥
वासना बहु भोगिते नच त्यांतुनी सुख अंशना ॥
ही नदी भव भ्रांतिची मृग नीरसें तम टेकणा ॥ दे० १० ॥
आळसी निज मोकळी नयनावरी तम संचरे ॥
लाकिया सबळी बरी सुख लेकणी मति ताजिरे ॥
मोडि तूं तुजवीण ती अनंती रितीनुमजे वणा ॥ दे० ११ ॥

## बोधरूप

॥ भुजंगप्रयात ॥

करावी दया रामराया दिनाची ॥ असो दे मिती दासया रामराची ॥
नसे मागणें आणि दूजें मला तें ॥ पदा दाखवी हारवी आपदाते ॥ १ ॥
नको वालुं या संसृती बंधमूळा ॥ मला थार दे प्रेमछंदें कृपाळा ॥
नको फंद तो वीषयाचा मला रे ॥ सदा आननीं नाम तूझें वसों रे ॥ २ ॥
बहु काळ गेला पशू अन्य वाती ॥ असे भोगिली फार ती गा फजीती ॥
मिती नाम ती तेथगा मूढ ठाणें ॥ बहु क्लेश बापा किहुं तेचि नेणें ॥३॥
बरी मानवी ही तनू प्राप्त आतां ॥ गमावूं कशी राघवा सांग आतां ॥
विषाचे परीं वीषयीं भास होतो ॥ बहु त्रास वाटे जगा ठायिं गा तो ॥४॥
नसे सोयिरा दूसरा तुजवीणें ॥ सदा फूळ गोतीं तुंची एक जाणें ॥
सुखालागिं पायीं मना ध्यास लागो॥ सदा मीपणा तोडुनी देह वागो ॥ ५ ॥
बहू पोंचले पैलपारीं समर्था ॥ तुझें नाम गा चूकवी या अनर्था ॥
मुनी सिद्ध साधू जपी तापसी ते ॥ तुला पाहती आपुलाल्या गतीं ते ॥६॥
उरी ना सरी भाविकांची तयासी ॥ नसे साक्षि गा या भुमीभागिं यासी ॥
सदां तूजला पाहती अंतरीं जे ॥ अहं या मदा टांकुनी सार हो जें ॥ ७ ॥
दयाशांति अंगीं तया फार नाहीं ॥ भरा संसृतीला कदां भीत नाहीं ॥
तयाच्या उरीं वास तूझा हरी रे ॥ मदा मांझिया आज तूं गा हरी रे ॥८॥
जळो काम खोटा टळो वासना ही ॥ झडो दंभ ताठा मिटो कल्पनाही ॥
वसों भावभक्ती तुझ्या नामगीतीं ॥ नसे याविणा मागणें या अनंतीं ॥९॥

( शार्दूलविक्रीडित. )

वाढे गोकुळग्रामिं तो यदुपती नंदाघरीं भक्तिनें ॥
ये तीर्थे उपदेशिला म्हणुनिया झालें तसें मानने ॥
राणी नंदजिची सुबोध-जननी शांती दया उन्मनी ॥
तेथें नीगम नाटका करितसे भक्तीस त्या जाणुनी ॥ १ ॥
सात्वीक अतिचा स्वभाव पहिला भावीक हा नंदजी ॥
कांताही मतिशोधनी यशुमती कृष्णा म्हणे नंदजी ॥
गोपी त्या श्रुतिशा जमाव सकळी गोपाळ ते हो गडी ॥
प्रेमाचे पुतळे सदैव बरवे झाले जमा ते थडी ॥ २ ॥
वेदीवांकडि शोभती बहु सुखें गायी वनीं वेढुनी ॥
सर्गे माधव शाम तो वलतसे हीरा जसा कोंदणीं ॥
खांदीं कामळि वेत्रकाठि करि ती शिंकीं शिदोरी-करीं ॥
वारी जाश्च हरी तमभवो खेळान्वयें-कूसरी ॥ ३ ॥
नाना भाव अभाव डाव हरवी जेवीं रवी तो निशी ॥
खेळाचें मिष काननोसरितिची बोधार्थ वाणी खुपी ॥
नाना शास्त्र विचार योग सकळी वेदांतरीं वागती ॥
खेळाचें मिष भ्रांति ते हरविण्या बोधार्थहीहो निती ॥ ४ ॥
बीजाचें सदनीं गडे हरि जिचे तीघे बरे प्रीतिचे ॥
सूदामा वडजा तसाच तिसरा पेंदा हरी मानिचे ॥
भावाचा पुतळा सुदाम बरवा पेंदासमें बोधतो ॥
विश्वारान्वय वाकडा हरि गडी त्याची कथा सांगतों ॥ ५ ॥
भावें मानस लावुनी कथन हें आजी करा आदरें ॥
ध्यावें जी श्रवणीं अनूभव मंदी अंगीं हरी आभरे ॥
व्याधी रोग पळे गळे अभिमती शांती वळे मानसीं ॥
गायी साज अनंत भाव मतिनें स्थूलोद्भवाचे कुशीं ॥ ६ ॥

( वसंततिलका. )

काळीं वसंत ऋतुच्या यमुना तिरीं हो ॥ खेळे हरी गडिसही नवभाव ते हो ॥
गायी वनांत चरती सद शोधनीच्या ॥ गोपाळ बाळ रमले गुण खेळणीच्या॥ १ ॥

( कामदा )

मीतभाषणी नीत लाघवी ॥ गोरटी सखी प्रेमता नवी ॥
नीजपारखी नारि राधिका ॥ कृष्ण येथुनी प्रात कौतुका ॥ १० ॥

( द्रुतविलंबित )

घटितही सकला हरि मीळणी ॥ वळतसे घनसा सति योकणी ॥
किति कानडि कोकणी गूजरी ॥ किति व्रजामधल्या घर अंतुरी ॥ ११ ॥

( उपचित्र )

जवळी हरिच्या सकळीक त्या ॥ जमती गमती मतिमान त्या ॥
भिति ना जगती मधि बायका ॥ परभावमति निति नायका ॥ १२ ॥

( शिखरिणि )

गड्याठायीं होता हरी मुरलिनें ओंठिं धरुनी ॥
कदंबाचे छाये घननिळतनू मंजुळ ध्वनी ॥
दुडा धाठीं पायीं कटित धनुला वागत हरी ॥
गळां शोभे माळा वनसुमन तें स्वास्तिक वरी ॥ १२ ॥

( पृथ्वी )

पदाब्ज बहु कोंवळें सितमती वदे भाव तो ॥
मनोघ जडणी जडे सति प्रति बहू प्रेम तो ॥
नदी निरभरे निधीप्रति तशा हरि गोपिका ॥
हरी गुणनिधी प्रती मिळती ह्या वन्या बायका ॥ १४ ॥

( भुजगप्रयात. )

प्रभा कांचनाचीं कळा कोंदणाची ॥ सभे गोपिकांची मधें या हरीची ॥
मिती हो निळाची जडे जारमदीसी॥पदा मीळणी झाकि ते ऐक्यदीसी॥१५॥

( दिंडी )

गडी तेव्हां बोलती कृष्णनाथा ॥ थव्रा आला धांगड्या गोपि आतां ॥
तुझी झाली सूगि ही मना ऐसी ॥ अम्ही आंता जाउंरे धेनुपासी ॥ १६ ॥
गडी खोडी काढिती बहू रीतीं ॥ हरी हांसे नाटकी वानगीतीं ॥
जमा सारी येक ती भागिं झाली ॥ स्वादभात्रो आमरे चित्त मेली ॥१७॥

( शार्दूलविक्रीडित )

राधेनें मिठि दीधकी बहु घटी कंठी करा घालुनी ॥

कलीलागी येतां वरचडपणें काय नित ही ॥
विधीनें ही कैसी घडविली घडी नाहि घड ही ॥ ४२ ॥

( पृथ्वी. )

स्त्रियाच मुळच्या तुम्ही भुलमती जनी कातरा ॥
तरा नच दुजी भवांबुमधीं या भवा आसरा ॥
मती कपटही निती सरळ नाहि ती वूड गे ॥
कितीक करिता अशी अवकळा प्रिती भंग गे ॥ ४३ ॥

( वसंततिलका. )

आल्याति कां मजकडे मुळ कोणि केलें॥ कां बाकडे धरितसां मति भाव झालें॥
टाकोनिया पति घरांदिक या वनी गे ॥ यावें नची परपणें रित वायकागें॥४४॥

( शार्दूलविक्रीडित. )

आहे मी पर गे सती परतुनी भीती तुमां नां कसी ॥
नासी कां वर दाविता कवतुका कोण्या रुपें ही खुपी ॥
राधा ही मति लाघवी सति तुम्ही गोपि तिच्या सांगडी ॥
सारा एकचि मासला भवगुणी नाहीं तुमा मी गडी ॥ ४५ ॥

( द्रुतविलंबित. )

मुक मला मति ते भलि राधिके ॥ भरुनियां हरिली मुरली निकें ॥
मरूळती करुनी मधि आपणा ॥ करुनियां सद्शोधन त्या पणा ॥
निगम गे अधरी गुज बोधनीं ॥ मम मती मुरली मुरलीध्वनीं ॥
असि लिळा हरवी असि ना भलीं ॥ सति तुमाविण गे मज आठवी ॥४६॥

( उपचित्र )

मजला कळही करिवीकळा ॥ भवि या रमणी निजही कळा ॥
दळलां तुमिं ही मुरलीस गे ॥ म्हणुनी वदलों नच राग गे ॥ ४७ ॥

॥ सवाई• ॥

ऐकुनियां मग त्यास ति बोलति लाघवी माधव जाणुनियां ॥
काय तुला भुळ फार जडे उरिं कां उगिं बोलसि ठासुनियां ॥
चोर तूं नाटकि काय तरा तरिं अतरिं या भरल्या असती ॥
गोड वरी परि आंत कठोर मति वचनें तुजिं भाषविती ॥ ४८ ॥

भक्तभावें सुखावोनी ॥ नाचतो निजरंगणीं ॥
कीर्तनाची असे गोडी ॥ मानसीं प्रेमभावनें ॥ ८ ॥
जयामूखीं हरी नांदे ॥ अतरा तेथ नाच दे ॥
सदा मार्गे पुढें रक्षी ॥ गोवळा धेनु ज्यापरीं ॥ ९ ॥
हरिदासीं नसे माया ॥ स्नान काया न रेखिती ॥
सदानंद घनाश्रयीं ॥ वास केला सुखान्वयें ॥ १० ॥
रुद्र गाथा सुखें गातां ॥ शोक चिंता न शीवती ॥
चिती शांती अनीती तें ॥ अनंतरूपीं वमेचिना ॥ ११ ॥

## राम सगुणवर्णन.

( अनुष्टुप )

नमोनियां गुरुपाया ॥ गुणी राम वदों सुखें ॥
अगूणी अरुपी जो कां ॥ असाक्षी अखिल जगा ॥ १ ॥
सदानंदू सदाळीं जो ॥ सदाचारी सुदेखणा ॥
कृपानिधी दिनार्थी जो ॥ भक्तप्रिय सदां असे ॥ २ ॥
बहूरूपी बहूभाती ॥ समत्वें सम आपणा ॥
नीज दासांमधीं वागे ॥ निर्मोही करि साधना ॥ ३ ॥
नीजभक्तीं प्रिती मोठी ॥ सरोजीं भ्रम राजसीं ॥
नीजता जेथिचे ठायीं ॥ सुखावे रघु तेथ हा ॥ ४ ॥
कथा गोडी सुधा कोटी ॥ आवडी अक्षरीं जडे ॥
उडे भ्राती अविद्येची ॥ शांति विद्या भरे ऊरीं ॥ ५ ॥
काळ वेळ न लागे या ॥ यातना चुकवी भया ॥
दयामूर्ती समत्वानें ॥ वागवी चित्त सर्वदां ॥ ६ ॥
नसे आणी कधीठायीं ॥ तरुणोपाय या जगा ॥
हरीभक्तीविणा चित्ता ॥ साधनें सर्व बाधती ॥ ७ ॥
कर्म शुद्धि मतीकारीं ॥ श्रुति वेद हेंचि बोलती ॥
परि कर्मी अहंभावो ॥ सूटला नच ऐकतों ॥ ८ ॥
कर्म चारा चरायाला ॥ भक्तिधेनु जयाचि ही ॥
तया गोडी प्रबोधाची ॥ वासरा पय ज्यापरी ॥ ९ ॥

